# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे **P.S.(ठाणे):** थाळनेर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0152 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**12/11/2025 21:25

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 11/11/2025
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 12/11/2025
**Time From (वेळेपासून):** 11:10 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:12 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 12/11/2025 **Time (वेळ):** 20:59 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 018
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/11/2025 20:59 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 7 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** या शाळेतील इमारतीच्या जिन्यावर,महात्मा गांधी विद्यालय,मांजरोद, मांजरोद ,ता शिरपुर जि धुळे
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** दिपक देविदास भोई
(b) **Father's Name (वडील चे नाव) :** देविदास भोई
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | करवंद नाका, शहादा रोड,सेंट्रल बँक इमारत, दुसरा माळा,शिरपुर, ,जि धुळे, थाळनेर ,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | करवंद नाका, शहादा रोड,सेंट्रल बँक इमारत, दुसरा माळा,शिरपुर, ,जि धुळे, थाळनेर ,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9370340525

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कैलास सखाराम पाटील | | वडील का नाम : सखाराम पाटील | 1. 23/ब,महाविर विहार,,मांडळ शिवार, ,शिरपुर ,ता शिरपुर जि धुळे ,थाळनेर ,धुळे,महाराष्ट्र, भारत |
| 2 | गोपाल रघुनाथ पाटील | | वडील का नाम : रघुनाथ पाटील | 1. 20/ब,,प्रेमकमल नगर, ,मांडळ शिवार,शिरपुर ,ता शिरपुर जि धुळे ,थाळनेर ,धुळे,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 30 भारतीय चलनी नोटा | 15,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-) (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

15,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

थाळनेर पोलीस स्टेशन

दि.12.11.2025

मी यशवंत विश्वनाथ बोरसे, वय 38 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे

समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे तीन महिन्यांपासुन कार्यरत आहे. दि.06.11.2025 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना पोलीस उप अधीक्षक श्री सचिन साळुंखे यांनी तक्रारदार दिपक देविदास भोई यांनी त्यांच्याकडे शिरपुर येथील लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याची माहिती दुरध्वनीद्वारे कळविल्याचे सांगुन आम्हास मांजरोद, ता. शिरपुर येथे जावुन तक्रारदार यांची तक्रार नोंदवुन पुढील कार्यवाही करण्यास आदेशित केले. त्याप्रमाणे आम्ही प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, धुळे येथील दोन शासकिय कर्मचारी मयुर मधुकर सोनवणे, कनिष्ठ लिपीक व गौरव रमेश भामरे, कनिष्ठ लिपीक यांना उपलब्ध करुन घेवुन आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे खाजगी कार क्र. एम.एच.01 डीपी 1978 ने रवाना होवुन मांजरोद गावा बाहेरील थाळनेर रस्त्यालगत पोहोचलो. तेव्हा ठरल्याप्रमाणे तक्रारदार हे आम्हास सदर ठिकाणी भेटले. तेव्हा आम्ही त्यांना वाहनात बसवुन घेवुन त्यांना आमची ओळख देवुन त्यांची ओळख करुन घेवुन त्यांना दोन्ही पंचांची तसेच सापळा पथकाची ओळख करुन दिली.

त्यानंतर आम्ही तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव दिपक देविदास भोई, उपशिक्षक, जनता शिक्षण प्रसारक संस्था, बेटावद ता. शिंदखेडा जि. धुळे संचलित महात्मा गांधी विद्यालय, मांजरोद, ता. शिरपुर, जि. धुळे. असे सांगुन त्यांनी त्यांचे तक्रारीची तोंडी हकीगत सांगुन त्यांची स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार लिहुन दिली ती ''मी जनता शिक्षण प्रसारक संस्था, बेटावद ता. शिंदखेडा जि. धुळे संचलित महात्मा गांधी विद्यालय, मांजरोद, ता. शिरपुर, जि. धुळे येथे जुन 2019 पासुन उपशिक्षक या पदावर कार्यरत आहे. माझी जुलै 2023 पासुन वार्षिक वेतनवाढ स्थगित केली आहे. तसेच मला सेवेस 12 वर्ष पुर्ण होवुन देखील मला वरिष्ठ वेतन श्रेणी लागु करण्यात आलेली नाही. माझ्या स्थगित केलेली वार्षिक वेतन वाढ व वरिष्ठ वेतन श्रेणी लागु होणे बाबत मी सन 2023 पासुन वेळोवेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. कैलास पाटील यांची भेट घेवुन त्यांना विनंती केली आहे. तसेच त्यांना दि.11.10.2025 रोजी वरिष्ठ वेतन श्रेणी लागु होणे बाबत विनंती अर्ज दिलेला आहे. परंतु मला स्थगित केलेली वार्षिक वेतन वाढ व वरिष्ठ वेतन श्रेणी लागु न झाल्याने मी सुमारे 08 दिवसापुर्वी मुख्याध्यापक श्री. कैलास पाटील यांची भेट घेवुन त्यांना स्थगित केलेली वेतन वाढ व वरिष्ठ वेतन श्रेणी लागु करणेबाबत विनंती केली असता त्यांनी ''तुला स्थगित केलेली वेतन वाढ व वरिष्ठ वेतन श्रेणी लागु करायची असेल तर संस्थेचे चेअरमन यांचे

सुचनेप्रमाणे तुला उपशिक्षक श्री.गोपाल पाटील यांचेकडे 15,000/- रुपये दयावे लागतील, त्यानंतर तुझ्या स्थगित केलेली वेतन वाढ व वरिष्ठ वेतन श्रेणीची कार्यवाही करेल, त्याशिवाय तुझे काम होणार नाही.'' असे सांगितल्याची तक्रार दिली होती. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी मुख्याध्यापक कैलास पाटील यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांची भेट घेवुन पडताळणी कार्यवाही करावयाची असल्याचे पंचांना सांगितले.
तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी करणेकामी तक्रारदार व दोन्ही पंचांना सुचना देवुन तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना आम्ही थांबलेल्या ठिकाणाहुन मुख्याध्यापक कैलास पाटील यांची भेट घेण्यासाठी महात्मा गांधी विद्यालय, मांजरोद येथे तक्रारदार यांची कार क्रमांक एम.एच. 18 बीआर 7382 ने व त्यांचे पाठोपाठ पंच नं. 01 मयुर सोनवणे यांना ला.प्र. विभागाच्या शासकिय दुचाकी क्र. एम.एच.18 बीडब्ल्यु 5662 ने रवाना केले. त्यानंतर बऱ्याच वेळाने तक्रारदार व पंच मयुर सोनवणे असे मुख्याध्यापक कैलास पाटील व उपशिक्षक गोपाळ पाटील यांची भेट घेवुन आमचे जवळ परत आले. तेव्हा पंच नं. 01 सोनवणे यांनी तक्रारदार यांची मुख्याध्यापक कैलास पाटील यांचेशी भेट झाल्यावर त्यांचेत तक्रारदार यांच्या कामाबाबत चर्चा होवुन त्यांनी तक्रारदार यांना बापु साहेबांना सांगितले आहे, तु बापु साहेबांशी बोलला आहे का? अशी विचारणा केली असता तक्रारदार यांनी नाही असे सांगितल्यावर मुख्याध्यापक कैलास पाटील यांनी बापु साहेबांनी तुझे काम दिले असुन तुम्ही उपशिक्षक गोपाळ पाटील यांना भेटुन ठरवुन घ्या असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी शाळेत उपशिक्षक गोपाळ पाटील यांची भेट घेतली. तेव्हा त्यांच्यात कामाबाबत चर्चा होवुन त्यांनी तक्रारदार यांना तुमच्या कामाबाबत बापुंना बोललो असल्याचे सांगुन तक्रारदार यांच्याकडे दोन्ही कामे करुन देण्यासाठी बापुंना देण्याकरीता 15,000/- रुपये लाचेची मागणी केली असल्याची हकिगत कथन केली. सदर कथन केलेल्या हकिगतीवरुन व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये मुख्याध्यापक कैलास पाटील, उपशिक्षक गोपाळ पाटील व तक्रारदार यांचेतील ध्वनीमुद्रित झालेले संभाषण ए्ेकुन मुख्याध्यापक कैलास पाटील यांनी तक्रारदार यांना त्यांचे कामाकरीता उपशिक्षक गोपाळ पाटील यांना भेटुन दोन्ही कामांचे ठरवुन घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी उपशिक्षक गोपाळ पाटील यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांच्याकडे बापुंना देण्याकरीता 15,000/- रुपये लाचेची मागणी केल्याची खात्री झाली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेशी चर्चा करुन आम्ही मुख्याध्यापक कैलास पाटील व उपशिक्षक गोपाळ पाटील यांचेवर दि.12.11.2025 रोजी सापळा लावण्याचा निर्णय घेवुन तक्रारदार यांना आमचे संपर्कात राहण्याच्या सुचना दिल्या होत्या. तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
त्यानंतर आज रोजी दोन्ही पंच, आम्ही व सापळा पथक असे शासकिय वाहन क्रमांक एम.एच. 18 बीएक्स 0221 ने तसेच पोकॉ. रामदास बारेला हे ला.प्र.विभागाच्या शासकिय दुचाकी क्र. एम.एच. 18 बीडब्ल्यु 5662 ने ला.प्र. वि. धुळे कार्यालयातुन रवाना होवुन शिरपुर येथे करवंद नाका, साईबाबा कॉलनी, जैन कोचिंग क्लासेस समोर रस्त्यालगत जावुन तेथे तक्रारदार दिपक देविदास भोई यांची भेट घेतली. तेव्हा त्यांचेशी चर्चा करुन आम्ही सापळा आयोजित केला. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्याकडे मुख्याध्यापक कैलास पाटील यांच्या सांगण्याप्रमाणे व उपशिक्षक गोपाळ पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना देण्याकरीता तक्रारदार यांच्याकडुन 500/- रुपये दराच्या 30 नोटा असे एकुण 15,000/- रुपये असे सापळाकामी हजर केल्याने आम्ही सदर नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर तक्रारदार व पंचाना सापळा कारवाईबाबत सुचना देवुन तक्रारदार यांना त्यांच्या कारने व पंच नं. 01 सोनवणे यांना त्यांचे पाठोपाठ शासकिय दुचाकीने महात्मा गांधी विद्यालय, मांजरोद येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही शासकिय वाहनाने जावुन मांजरोद गावातुन महात्मा गांधी विद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यालगत वाहन थांबवुन शाळेच्या परिसराच्या आजुबाजुस सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी शाळेच्या व्हरांडयातुन ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा आम्ही व सापळा पथकाने उपशिक्षक गोपाळ पाटील यांना रंगेहात पकडुन ताब्यात घेतले. तेव्हा आमच्या सुचनेवरुन पंच नं. 02 गौरव भामरे यांनी उपशिक्षक गोपाळ पाटील यांच्या हातातील 15,000/- रुपये लाचेची रक्कम ताब्यात घेतली. त्यानंतर सदर शाळेतील मुख्याध्यापकांच्या कार्यालयात आवश्यक ती कार्यवाही करुन मुख्याध्यापक कैलास पाटील व उपशिक्षक गोपाळ पाटील यांना ताब्यात घेवुन ला.प्र.वि. धुळे कार्यालयात येवुन तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
अशाप्रकारे तक्रारदार दिपक देविदास भोई, उपशिक्षक यांची स्थगित केलेली वार्षिक वेतन वाढ व वरिष्ठ वेतन श्रेणी लागु होणे करीता लोकसेवक कैलास सखाराम पाटील, मुख्याध्यापक यांनी तक्रारदार यांचेशी त्यांचे कामाबाबत चर्चा करुन लोकसेवक गोपाळ रघुनाथ पाटील, उपशिक्षक, महात्मा गांधी विद्यालय, मांजरोद यांची भेट घेवुन दोन्ही कामांचे ठरवुन घेण्यास सांगितले असता तक्रारदार यांनी उपशिक्षक गोपाळ पाटील यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांचे काम करुन देण्याकरीता दि.06.11.2025 रोजी पंचांसमक्ष 15,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम आज दि. 12.11.2025 रोजी सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष शाळेच्या

जिन्यामध्ये 11:12 वाजता स्वत: स्विकारुन मुख्याध्यापक कैलास पाटील व उपशिक्षक गोपाळ पाटील यांनी स्वत: चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग केला म्हणुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

shatrughna aatmaram patil(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Bhushan Chaudhari HC/1622

पोलीस ठाणे अमंलदार
पाळनेर पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): shatrughna aatmara
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)